**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/पुवि/लो.सा.निवडणूक-संकल्प पत्र/२०२४/5480 दि. ०८/०४/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे जिल्हा,
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित / कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे जिल्हा.**

विषय - **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**शालेय विद्यार्थ्यांद्वारे "आई-बाबा, आजी-आजोबा मतदानाला चला !" उपक्रम राबविणेबाबत..**

संदर्भ - १. मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे यांचे पत्र क्र. उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/९८/२०२४ दि. ३.४.२०२४.
२. या कार्यालयाचे पत्र क्र. ससं/उशि/पुवि/लो.सा.निवडणूक-संकल्प पत्र/२०२४/५४५२ दिनांक ३.४.२०२४.

उपरोक्त विषयाचे संदर्भांकित पत्रांच्या विषानुषंगाने कळविण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पुणे जिल्हयात एकूण ४ लोकसभा मतदार संघांमध्ये तिस-या व चौथ्या टप्प्यामध्ये निवडणूक होणार असून नागरिकांनी मोठया संख्येने मतदान करावे याकरिता **"आई-बाबा, आजी-आजोबा मतदानाला चला !" हा अभिनव उपक्रम राबविणेत येणार आहे.**

पुणे जिल्हयातील चार लोकसभा मतदार संघांतर्गत एकूण २१ विधानसभा मतदार संघ असून २०१९ लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांमधील मतदानाची टक्केवारी राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा कमी असून ते वाढविणेकामी नागरिकांमध्ये जनजागृती करणेकरिता मा. भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार मतदानाच्या दिनांकापर्यंत **आपले महाविद्यालयांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या आई-वडील, आजी-आजोबा यांचेकडून मतदान करणेबाबतचे संकल्प पत्र भरुन घेणे तसेच आई-वडील, आजी-आजोबा यांना मतदानाचे आवाहन करणारे पत्र/ग्रिटींग कार्ड/पोस्टर्स तयार करुन घेण्याचा उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.**

त्यानुसार आपले **विद्यापीठातील / महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून त्यांचे आई-वडील व आजी-आजोबा यांचेकडून मतदान करणार असल्याचे संकल्प पत्र भरुन घ्यावे तसेच आई-वडील, आजी-आजोबा यांना मतदानाचे आवाहन करणारे पत्र/ग्रिटींग कार्ड/पोस्टर्स तयार करुन घेऊन तो एकत्रित अहवाल**

**https://forms.gle/RtuFt7NMSit3xjuk7 या गुगलफॉर्मवर दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत न चुकता सादर करण्यात यावी. याबाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

सदरचा उपक्रम राबवितांना खालील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१. स्वीप व्यवस्थापन कक्ष, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेले विहित नमुन्यातीलच संकल्प पत्र विद्यार्थ्यांमार्फत त्यांचे आई-वडील, आजी-आजोबा यांचेकडून भरुन घेण्यात यावे. ज्या महाविद्यालयांनी यापूर्वी संकल्प पत्रे भरुन घेतलेली आहेत त्यांनी याबाबतचा अहवाल मा. उपजिल्हाधिकारी यांचे कार्यालयास एकत्रित सादर करावा.

२. बहुतांश महाविद्यालयांमध्ये परीक्षा कालावधी सुरु असून त्यांनी परीक्षा कालावधी संपण्यापूर्वी विद्यार्थ्यांकडून संकल्प पत्र भरुन घ्यावे.

३. आई-वडील व आजी-आजोबा यांना मतदानाचे आवाहन करणारे पत्र/ग्रिटींग कार्ड/पोस्टर्स तयार करण्याचा उपक्रम विद्यार्थ्यांकडून परीक्षांचा कालावधी वगळून राबविण्यात यावा.

४. सर्वोत्तर आहवानपत्र पत्र/ग्रिटींग कार्ड/पोस्टर्स बनविणा-या विद्यार्थ्यांची निवड महाविद्यालयीन स्तरावर करुन त्याला महाविद्यालयीन स्तरावर सन्मानित करावे.

**यासंदर्भात दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता सर्व प्राचार्यांची ऑनलाईन बैठक घेण्यात येणार आहे. सदर बैठकीस आपण स्वत: ऑनलाईन उपस्थित रहावे. सदर बैठकीची लिंक** https://meet.google.com/ixo-zyki-qdx

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत - मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांना माहितीस्तव सादर.

# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

## __________ लोकसभा मतदार संघ

## संकल्प पत्र

**प्रिय आई बाबा,**

मला माहिती आहे कि आई - बाबा तुम्ही माझ्यावर खूप प्रेम करता, माझे उज्वल भविष्य घडविण्यासाठी तुम्ही दिवस - रात्र परिश्रम करित आहात. माझे भविष्य देशाच्या मजबूत लोकशाहीशी जोडलेले आहे. यासाठी मी तुम्हाला एक संकल्प करायला लावणार आहे. __________ मतदारसंघाच्या लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये तुम्ही दिनांक __ मे २०२४ रोजी तुमचे अनमोल मत द्यायला जरूर जायचे आहे. मला विश्वास आहे कि तुम्ही हा संकल्प निश्चित पूर्ण करणार.

संपूर्ण नाव: ______________________________ तुमचा प्रिय मुलगा/मुलगी (सही):__________

## आई- वडिलांचा संकल्प

आम्ही असा संकल्प करतो कि, आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणात निवडणुकांचे पावित्र्य राखू. या निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात,समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू. तसेच आमचा मित्रपरिवार यांना देखील मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करू.

आईचे नाव:________________________ वडिलांचे नाव:__________________________

सही: __________ सही: __________

मोबाईल क्रमांक:__________________ मोबाईल क्रमांक:____________________

राहण्याचा पत्ता :______________________________________________________________